**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 39** **September - October - 2025**

# ग्रंथालय सेवा : सोशल मीडिया व इंटरनेट सेवेचा वापर व प्रभाव

**सौ. दिपाली धनाजी बंडगर.**
***सहा. ग्रंथपाल. डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, मिरज***
*Corresponding Author –सौ. दिपाली धनाजी बंडगर.*
**DOI - 10.5281/zenodo.17283219**

***सारांश:***

*ग्रंथालय माहितीचा प्रसार आणि जागरूकता करण्यासाठी सोशल मीडियाचा जास्तीत जास्त वापर करत आहेत तात्काळ माहिती शोधणे व वाचकापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दिवसेंदिवस ग्रंथालयाचे स्वरूप बदलत चालले आहे. ग्रंथालय हे पुस्तकी ज्ञान देवघेव करण्या पुरते मर्यादित न राहता Knowledge Resource Centre म्हणून कार्य करीत आहे. 19 वे शतक ते 21 व्या शतकापर्यंत ग्रंथालयाचे स्वरूप दुप्पटीने बदलले आहे. ते आज डिजिटल ग्रंथालय म्हणून सामान्य वाचक ते संशोधकाच्या सर्व माहिती विषयक गरजा भागवण्याचे महत्त्वाचे Resource Centre म्हणून कार्य करीत आहे. दुर्मिळ ग्रंथ, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, थोर विचारवंत, समाज सुधारक, साहित्य कथासंग्रह, कादंबरी, चरक संहिता, सुश्रुत, संशोधन लेख, सोशल मीडियावर उपलब्ध आहेत. सोशल मीडियाचा वापर करून ग्रंथालय वापरण्याचे कौशल्य. स्रोत वापरण्यातील कौशल्य. माहितीची देवाण - घेवाण करणे सुलभ रित्या शक्य होते प्रस्तुत लेखात ग्रंथालीन सेवांमध्ये सोशल मीडिया व इंटरनेट चा वापर आणि प्रभाव यांचा अभ्यास करण्यात आला आहे.*

***की वर्ड्स :- सोशल मीडिया, इंटरनेट, फ्लॉपी डिस्क, Library 2.0. Google 2.0. AI Tools.***

**प्रस्तावना :**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रचंड माहितीचा विस्फोट होत आहे ज्ञान माहिती ग्रंथालय हे केवळ पुस्तकाचे भांडार नाही तर ते माहितीचे केंद्र आहे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे ग्रंथालयाच्या सेवांमध्ये अपरिहार्य बदल झाले आहेत पारंपारिक स्वरूपातील ग्रंथालय सेवा जसे की संदर्भसेवा ग्रंथ देवघेव सेवा पुस्तक उधारी या सेवा डिजिटल युगात अधिक व्यापक झाले आहेत. इंटरनेट, सोशल मीडिया यामुळे ग्रंथालयाचे कार्य पुस्तक देणे घेण्यापुरते मर्यादित न राहता डिजिटल ज्ञान केंद्र म्हणून विकसित होत आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, Instagram, Facebook, Whatsapp, Youtube, नेटवर्क साधने, ऑनलाईन डाटाबेस, Open Access लायब्ररी यांच्या साह्याने ग्रंथालय केवळ माहिती पुरवत नाही, तर ज्ञान व्यवस्थापन माहितीच्या संप्रेषण वाचक जागरूकता निर्माण करणे आणि समुदायाशी संवाद साधने हे नवे कार्यक्षेत्र निर्माण करतात.

**संकल्पना :**

सोशल मीडिया सोशल नेटवर्क वेळेवर आधारित सेवा हे माहितीच्या संप्रेषणास उपलब्ध स्रोत आहेत. ग्रंथालयांमध्ये या माध्यमाचा इंटरनेटचा वापर करून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती देणे

शक्य होते या तंत्रज्ञानाचा वाचकाला कौशल्य, कार्यक्षमतेचा विकास करण्यासाठी चांगला फायदा होऊ शकतो. AI generated SOP's per Instruments, Animated Videos per Technology transfer.

**सोशल मीडिया व्याख्या :**

इंटरनेटवरील अशी डिजिटल साधने किंवा प्लॅटफॉर्म ज्यावर वापर करते आपले विचार, माहिती छायाचित्रे, व्हिडिओ, लेख किंवा बातम्या तयार करून इतरांना शेअर करतात त्यांना सोशल मीडिया असे म्हणतात.

उदा. Instagram, Facebook Whatsapp, Twitter, Youtube, Threads, Pin, इ.

**इंटरनेट आधारित सेवा व्याख्या :**

समान आवड व्यवसाय शिक्षण किंवा उद्दिष्ट असलेल्या व्यक्ती समूह किंवा संस्थां ना एकत्र जोडून संबंध निर्माण करणारे जाळे म्हणजे इंटरनेट होय. उदा. LinkedIn Research Gate Facebook Groups, Websites Internet Application. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, ई - लर्निंग प्लॅटफॉर्म, ई –कॉमर्स, एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्म. Library 2.0, OTT.

**सोशल मीडिया, इंटरनेट आधारित सेवांचा उद्देश :**

1. नवीन ग्रंथ व लेख माहिती वापरकर्त्यापर्यंत पोहोचवणे.
2. वाचन संशोधनाने शैक्षणिक उपक्रमाची जाहिरात करणे
3. शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात सदस्यांमध्ये नेटवर्क तयार करणे .
4. अंतर ग्रंथालयीन सेवांच्या आधारे ग्रंथालयीन संसाधनाचा सामूहिक वापर करणे .
5. सहकार्य व अनुभवाचे देवाणघेवाण करणे .
6. ग्रंथालयातील पुस्तके जर्नल प्रबंध इत्यादींची घरबसल्या उपलब्ध करणे.
7. संशोधन माहिती साक्षरता आणि ऑनलाईन प्रशिक्षण उपलब्ध करणे .
8. ग्रंथालयाद्वारे ई डॉक्युमेंट्स डिलिव्हरी सदस्यता - .सेवा डेटाबेस पुरवणे
9. जागतिक स्तरावरील सर्व चालूघडामोडीची माहिती ताबडतोब वाचकाला देणे.

**सोशल मीडिया व इंटरनेटचा वापर :**

1. ग्रंथालयाच्या उपक्रमाची माहिती देण्यासाठी फेसबुक पेजचा वापर करणे .
2. ग्रंथालयातील नव्या पुस्तकाची यादी सूचना ई रिसोर्सेस लिंक शेअर करणे .
3. व्याख्यान कार्यशाळा व प्रशिक्षण व्हिडिओ आणि यासाठी Youtube चॅनेल चा वापर करणे .
4. जलद अपडेट्स व कार्यक्रम प्रसिद्धीसाठी Twitter, Instagram चा वापर करणे .
5. ई लर्निंग पोर्टल स्वयम -, एनपीटीएल, कन्सोशि- या उपलब्ध करून देणे .
6. ऑनलाइन ग्रंथालय सेवा DELNET, INFLIBNET सेवा चा वापर करणे .
7. माहिती शोधण्यासाठी Google, Bing, Yahoo यासारखे सर्च इंजिनचा वापर करणे .
8. इंटरनेट वरून रेफरन्स सेवा चा वापर करणे .
9. बुक रिन्यूअल, बुक रिझर्वेशन सुविधा, ऑनलाईन रिमाइंडर साठी वापर करणे .
10. वापरकर्त्यांसाठी ई - मेल आणि क्लाऊड सेवांचा वापर करणे.

**सोशल मीडिया व इंटरनेटचा प्रभाव :**

**सकारात्मक प्रभाव:**

1. **वाचकांमध्ये ज्ञानवृद्धी करणे** -:ई - पुस्तके ऑनलाइन डेटाबेस चा वापर करून वाचकांमध्ये ज्ञानवृद्धी करता येते .
2. **वाचकांमध्ये जागरूकता निर्माण करणे -:** ग्रंथालय कार्यक्रम, स्पर्धा, कार्यशाळेची प्रसिद्धी करून वाचकांमध्ये जागरूकता निर्माण करता येते.
3. **माहितीचा जलद प्रसार करणे -:** सोशल मीडिया आणि नेटवर्क चा वापर करून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती वाचकापर्यंत पोहोचवता येते .
4. **संपर्कामध्ये वाढ करता येते -:** विद्यार्थी संशोधक व ग्रंथपाल यांचा थेट शक्य होतो.
5. **ग्रंथालयीन सेवांचा विस्तार करणे -:** ई - पुस्तके ई - जर्नल सोशल मीडियावर शेअर करून ग्रंथालयीन सेवाचा विस्तार करता येतो .
6. **नवीन उपक्रम उपयुक्त माहिती प्रसारित करणे :-** ग्रंथालयीन नवीन उपक्रम कार्यक्रम उपयुक्त माहिती आकर्षक पद्धतीने मीडियावर मांडल्यामुळे तरुण पिढीचे लक्ष वेधले जाते.
7. **माहितीचे आदान प्रदान करणे :-** इतर ग्रंथालय संस्था संशोधकाशी नेटवर्किंग होऊन उपयुक्त माहितीचे आदान - प्रदान करता येते .
8. **वाचकांचा सहभाग वाढवणे -:** फेसबुक फॉर्म, चर्चा गटाद्वारे वापरकर्त्यांचा थेट सहभाग वाढतो व ग्रंथालयीन सेवांचा दर्जा सुधारता येतो.
9. **खर्च व वेळ याची बचत -:** सोशल मीडिया व इंटरनेट यामुळे माहिती शोधण्यासाठी व प्रत्यक्ष ग्रंथालयात येण्यासाठी लागणारा खर्च व वेळ याची बचत होते.
10. **दुर्मिळ ग्रंथाची उपलब्धता :-** जे ग्रंथ सहज मिळणे शक्य नसते अशा ग्रंथाचे इंटरनेट द्वारे सहज उपलब्ध करता येते.

**नकारात्मक प्रभाव:**

1. **ग्रंथालयापासून दुरावणे :** सर्व माहिती ऑनलाईन सहज मिळते. त्यामुळे वाचकांची ग्रंथालयात येण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे.
2. **माहितीच्या गोपनीयतेचा व सुरक्षितेचा धोका :** वापरकर्त्याची वैयक्तिक माहिती यांचा वापर गैरवापर होऊ शकतो हॅकिंग, फिशिंग यासारखे धोके होत आहेत.
3. **वेळेचा अपव्यय व विचलन:** सोशल नेटवर्किंग मध्ये शैक्षणिक माहितीपेक्षा मनोरंजन जाहिराती चॅटिंग यांचे प्रमाण जास्त असल्याने वाचक भटकतात व वाचकांचा अभ्यासाचा वेळ वाया जातो .
4. **माहितीची विश्वसनीयता कमी झाली आहे :** सोशल मीडियावर अप्रमानीत माहिती सहज उपलब्ध असते यामुळे ग्रंथालयाच्या प्रमाणित व शास्त्रीय माहितीच्या विश्वस्तेला धोका निर्माण होऊ शकतो.
5. **आर्थिक व तांत्रिक अडचणी उद्भवतात :** इंटरनेट आधारित सेवांसाठी सतत सबस्क्रिप्शन लागतात त्यामुळे खर्च वाढतो आणि तांत्रिक अडचणीमुळे सेवा खंडित होऊ शकते .
6. **ग्रंथपाल व वाचक यांच्या संवादामध्ये कमी :** वाचक ऑनलाईन संवादावर अवलंबून राहतात त्यामुळे ग्रंथपाल व वाचक संवाद कमी झाला आहे, त्यामुळे चर्चासत्र गट, अभ्यास, पुस्तक परीक्षण, ग्रंथालय कार्यक्रम, सामूहिक उपक्रमावर परिणाम झाला आहे .

7. **नैतिक प्रश्न व कॉपीराईट चे उल्लंघन -:** ई - पुस्तक, जर्नल, अनधिकृतरित्या शेअर केल्यामुळे कॉपीराईटचे उल्लंघन होत आहे, त्यामुळे ग्रंथालयाच्या नैतिक जबाबदारीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.
8. **ग्रंथालयाची प्रामाणिकता वाचन संस्कृती व सुरक्षिततेचा ऱ्हास -:** सोशल मीडिया सोशल नेटवर्क आणि वेब आधारित सेवा मुळे संवादाचे मूल्य वाचन संस्कृती माहितीची सुरक्षितता याचा ऱ्हास झाला आहे.
9. **वाचकांचे मानसिक आरोग्य धोक्यात -:** सतत वापरले जाणारे मोबाईल आणि इंटरनेट हे आजच्या वाचकांचे व्यसन बनले आहे आणि त्याचा शारीरिक व मानसिकतेवर पूर्ण परिणाम झालेला आहे, त्याच्यामुळे वाचकांचे शारीरिक व मानसिक संतुलन बिघडत चालले आहे.

**ग्रंथालयात वापरण्यात येणारे सोशल मीडिया नेटवर्क सेवा :**

1. **विकीज (Wikis) :** ऑनलाईन विश्वकोश असे म्हणतात. विकी मध्ये नव्याने माहिती समाविष्ट करता येते ग्रंथालय स्वतःचे विकी तयार करू शकते. त्यामुळे वाचकांना वेबसाईटवरील माहिती स्त्रोत वापरणे शक्य झाले आहे ही माहिती ऑडिओ, व्हिडिओ, मल्टिमीडिया स्वरूपात ठेवता येते.

2. **इन्स्टंट मेसेजिंग (Instant Messaging) :** इन्स्टंट मेसेजिंग चा वापर करून संदर्भ सेवा देण्याच्या पद्धतीला आभासी संदर्भ सेवा म्हणतात इन्स्टंट मेसेजिंग चा वापर करून ऑनलाईन संदर्भ सेवा देता येते वेब 2.0 तंत्रज्ञानामुळे चार्ज जी पी टी ची सुविधा उपलब्ध झाली आहे वाचक कोणत्याही ठिकाणाहून या लिंक द्वारा संपर्क करू शकतात. इन्स्टंट मेसेजिंग च्या साह्याने एका वेळ डेटा फाईल ऑडिओ व्हिडिओ क्लिप लिंक पाठवू शकतो त्यामुळे एकापेक्षा जास्त वाचक्याशी संवाद साधने शक्य होते.

3. **ट्विटर ( Twitter) :** ट्विटरच्या माध्यमातून मते , घटना बातम्या, फोटो, नकाशे देवाण - घेवाण करणे शक्य होते. ग्रंथालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमात उदा. ग्रंथ - प्रदर्शन व्याख्यानमाला चर्चासत्रे विविध कार्यशाळा वाचन संस्कृती वाढवण्यासाठी घेतले जाणारे विविध कार्यक्रम यासाठी Twitter चा वापर करता येतो.

4. **पॉडकास्टिंग (Podcasting) :** एखाद्या लेखकाचे वाचन साहित्य आवाजात ध्वनी मध्ये केले जाते. MP3 च्या साह्याने साठवता येते व हवे त्यावेळेस ऐकता येते अंध व्यक्तीसाठी हे तंत्रज्ञान आवश्यक आहे. इंटरनेट वरील पॉडकास्टिंग शोधण्यासाठी http://podcost.yahoo.com. या सर्च इंजिनचा वापर करून पॉडकास्ट ऐकू शकतो. ऐकण्यासाठी हेडफोन चा वापर केला जातो.

5. **टॅगिंग ( Taging) :** ग्रंथालयामध्ये Opac हाताळताना स्वतःचे निर्देश स्वतः तयार करून, स्रोत वापरण्याचे स्वतःचे नियोजन म्हणजे "टॅगिंग तंत्रज्ञान" होय. वाचकांनी आपल्या सोयीच्या सोप्या संज्ञा समाविष्ट केल्यास त्याचा लाभ सर्वांना मिळू शकतो.

6. **सोशल बुकमार्किंग (Social Bookmarking) :** ग्रंथालयामध्ये सोशल बुक मार्किंग साईटचा वापर करून वेबसाईटच्या लिंक साठवणे सोपे होते. ग्रंथालय मध्ये वाचकासाठी नेहमी लागणारे ओपन एक्स जर्नल ई - बुक जर्नल व इतर आवश्यक साइट्स वेबसाईट साठवून त्यातील लिंक वापरू शकतो.

7. **आरएसएस फीड्स (RSS Feeds) :** आरएसएस स्पीडच्या साह्याने ग्रंथालयातील वाचकांना विविध सेवा देता येतात नवीन माहिती स्रोत तयार

करता येतो तसेच त्यावर नियंत्रण ठेवता येते ग्रंथालयाच्या संकेतस्थळावरून ही सेवा दिली जाते ग्रंथालयात दाखल होणारी नवीन पुस्तके जर्नल नवीन अंक यांची माहिती वाचकांना सतत मिळत राहते त्यामुळे वाचकांचा ग्रंथालयाशी संपर्क राहतो.

8. **फ्लिकर (Fliker):** वेब 2.0 मधील अतिशय महत्त्वाचे साधन म्हणजे फ्लिकर होय. या तंत्रज्ञानाच्या साह्याने फोटो नकाशे चित्राचे देवाण - घेवाण भौगोलिक माहिती आदान प्रदान करणे शक्य होते. त्यामुळे वाचक अभ्यासासाठी फ्लिकर चा वापर करतात.

9. **युट्युब (Youtube) :** ग्रंथालयात सर्व कार्यक्रम व्हिडिओ युट्युब वर अपलोड करता येतात व डाऊनलोड करता येतात त्यामुळे जास्तीत जास्त वाचकांना त्याचा उपयोग होतो.

10. **व्हॉट्सॲप (Whatsapp ) :** व्हॉट्सॲपच्या साह्याने सोशल नेटवर्किंग मोठ्या प्रमाणात होत आहे व्हाट्सअप च्या साह्याने पुस्तक विक्रेते नवीन प्रकाशित पुस्तकाचे कव्हर पेज फोटो व्हॉट्सॲपला शेअर करतात व ते ग्रंथपाल लगेच वाचकांना शेअर करतात त्यामुळे लेटेस्ट माहिती वाचकांना मिळते.

11. **फेसबुक (Facebook ):** जगातील सर्व देशात फेसबुकचे जाळे पसरले आहे ग्रंथालयांमध्ये माहितीच्या प्रचारासाठी वाचकांचे संवाद तसेच थेट प्रश्न विचारणे सूचना देण्यासाठी फेसबुकचा वापर केला जातो इतर ग्रंथालय व संस्था सोबत Resource Sharing व Knowledge Sharing करता येते.

**ग्रंथालयात वापरण्यात येणाऱ्या इंटरनेट आधारित सेवा:**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वाचकांना इंटरनेट आणि वेब च्या माध्यमातून विविध सेवा देता येत आहे याचा वापर कधी केव्हाही आपल्या सोयीने वाचक करत असतो.

1) **डिजिटल ग्रंथालय सेवा: ई** – बुक्स ई - जर्नल्स संशोधन प्रबंध लेख यांचा संग्रह यासाठी वापरले जाते.

**सॉफ्टवेअर** :- Dispace, Greenstone, Eprints, उदा. (NDLI - National Digital Library of India Shodhganga ( PHD Thesis Repository by INFLIBNET)

2) **रिमोट अक्सेस सेवा:** विद्यार्थ्यांना घरून ही संसाधने पाहता यावीत म्हणून दिली जाणारी सेवा.

**सॉफ्टवेअर :-** Ezproxy ( Oclc द्वारे विकसित Open Athens, Shibboleth.

3) **इंटर लायब्ररी लोन (ILL):** एका ग्रंथालयाकडून दुसऱ्या ग्रंथालयाला पुस्तक, लेख मागवणे.

**सॉफ्टवेअर** :- DELNET, INFLIBNET's ILL Services. ILL Module in Koha.

4) **ऑनलाइन कॅटलॉग सेवा :(OPAC):**वाचकांना Opac द्वारे ग्रंथालयातील पुस्तके जर्नल ई - बुक्स सीडी शोधता येते.

**सॉफ्टवेअर** :- Koha, NewGenlib Libsyis, SLIM 21.

**ई - लर्निंग आणि माहिती साक्षरता** :वाचकांना ऑनलाइन शिक्षण डिजिटल साधनांचा वापर शिकवणे.

**सॉफ्टवेअर** :- Moodle, Google Classroom, Youtube / Webinar / Zoom Integration.

**युजर अकाउंट सेवा** :वाचक आपल्या खात्यात लॉगिन करून पुस्तके पाहू शकतात नोंद करू शकतात.

**सॉफ्टवेअर :-** Koha, Libsis, SLIM.

7) **सूचना अलर्ट सेवा:** ग्रंथालयात आलेली नवीन पुस्तके लेख वाचकांच्या आवडीप्रमाणे माहिती ईमेल नोटिफिकेशन द्वारे पाठवले जाते. **सॉफ्टवेअर** :-Koha SDI Module, Email Automation Tool, Rss Feeds Library Portals with Notification System. Zoho Mail, Live Chat Tools.

**8) ई - जर्नल शोध सेवा:** ग्रंथालय व संशोधक यांना हवे असणारी ही जर्नल स्रोत उपलब्ध करून दिले जाते. (Web - based Searching Tools . DOAJ Directory of Open Access Journal). J - Gate PubMed / MedLine, Scopus, Web of Science. Shodhganga व Shodhgangotri, INFLIBNET Google Scholar.

**9) माहितीचे डुप्लिकेशन:** एखाद्या साहित्यिकाची त्याच्या विनापरवाना माहितीचे डुप्लिकेट करणे त्याला "साहित्य चोरी" असे म्हणतात. Plagiarism सॉफ्टवेअर :- Turnitin, Grammarly, DrillBit.

**निष्कर्ष :**

1) इंटरनेटमुळे कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती मिळाल्यामुळे वाचकांचा वेळ वाचतो.

2) 24/7 तास सेवा उपलब्ध करून दिली जाते. एका क्लिकवर सर्व वाचकांना हवी ती माहिती हव्या त्या वेळेस हव्या त्या ठिकाणी उपलब्ध होत आहे. A World Knowledge ledge at your fingertips.

3) Digital Library - a path of Knoweldge in the Modern era.

**संदर्भसूची :**


1. फडके, द. ना. (2012), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण आवृत्ती 5 वी पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.
2. गवांदे, सु. नि. (2009), माहिती तंत्रज्ञान आणि व्यावसायिक माहिती प्रक्रिया, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन.
3. अन्नदाते शशिकांत, शेटे स्वाती - २०२३, अध्यापन व संशोधन अभियोग्यता, के. सागर प्रकाशन.
4. Kumar, S. & Sharma, P. (2020). Social media and library services New York, NY. Springer.
5. Bhatia, R. (2022). The impact of social media on modern libraries